



# ONE DAY INTERDISCIPLINARY NATIONAL CONFERENCE ON 'THOUGHTS OF MAHATMA GANDHI : YESTERDAY, TODAY & TOMORROW'

Organized by

Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded

&

Department of History, Economics & Philosophy

## KARMAYOGI TULSHIRAM PAWAR MAHAVIDYALAYA, HADOLTI

Tq. Ahmedpur Dist. Latur (M.S.)

NAAC Accredited With 'B' Grade

**Saturday 28th October 2023**




Impact Factor - 7.9 (SRJIF)

# उदयगिरी बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

ISSN - 2583-8423 (Online)
https://udayagiri.aaassher.org

A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History September - October - 2023 (ISSUE No - 04)



Chief Editor
**Dr. Anant N. Shinde**
Udayagiri Bahubhashik Itihas Sanshodhan Patrika

Executive Editor
**Dr. Deepak Bachewar**
Principal
Karmayogi Tulshiram Pawar Mahavidyalaya, Hadolti Tq. Ahmedpur Dist. Latur

Editors
**Dr. Ramesh Gangthade**
**Dr. Raosaheb Ingle**
**Dr. Suvarna Tenkale**



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| 48 | बेरोजगारी निवारणार्थ महात्मा गांधींच्या विचारांची प्रासंगिकता<br>- प्रा. डॉ. सच्चितानंद एस. बिचेवार, प्रा. डॉ. शिवराम जाधव | 515 – 118 |
| 49 | महात्मा गांधी यांच्या राजकीय विचारांचा अभ्यास<br>- अलका मारुती कचरे | 519 – 526 |
| 50 | महात्मा गांधीजी एवं सर्वोदय संकल्पना<br>- प्रा. राजकुमार ज्ञानोबा घाटे | 527 – 532 |
| 51 | महात्मा गांधीजींची ग्राम स्वराज्याची संकल्पना<br>- प्रा.डॉ. मदन लक्ष्मण शेळके | 533 - 538 |
| 52 | महात्मा गांधींच्या शैक्षणिक तत्वज्ञानाची आजच्या सामाजिक आणि राष्ट्रीय जीवनात प्रासंगिकता<br>- डॉ. बालाजी रंगनाथराव लाहोरकर | 539 - 543 |
| 53 | राष्ट्रपिता म. गांधी : राष्ट्र निर्माणातील भूमिका<br>- डॉ. सोनवणे जी. एन. | 544 – 548 |
| 54 | महात्मा गांधीजींच्या जन-आंदोलनांतील निर्भयता<br>- प्रा. डॉ. सुभाष गणपतराव बेंजलवार | 549 – 553 |
| 55 | महात्मा गांधी: सत्य आणि अहिंसा एक चिरंतन विचार<br>- प्रा. डॉ. कविता चंद्रकांत लोहाळे | 554 - 558 |





Scanned by CamScanner

Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023, Pages 549 – 553

**Original Research Article**

# महात्मा गांधीजींच्या जन-आंदोलनांतील निर्भयता

प्रा. डॉ. सुभाष गणपतराव बेंजलवार

विभाग प्रमुख, इतिहास विभाग, महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा, जिल्हा: लातूर ४१३५२१ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: sbenjal@gmail.com

महात्मा गांधी यांनी आधुनिक भारताच्या जडण घडणीत मोलाची भूमिका बजावली आहे. त्यांचा मोहनदास करमचंद गांधी ते महात्मा गांधी हा प्रवास थक्क करणारा असा आहे. महात्मा गांधी यांना एकूण ७८ वर्षाचे आयुष्य लाभले. खरे तर महात्मा गांधी यांनीच स्वत: आपण १२५ वर्षपर्यंत जगणारा आहोत अशी भूमिका व्यक्त केली होती. परंतु सनातनी वृत्तीच्या विरोधकांमुळे त्यांच्या आयुष्याचा वयाच्या ७८व्या वर्षीच शेवट घडून आला. महात्मा गांधी हे जरी ७८ व्या वर्षीच शारीरिकदृष्ट्या हे विश्व सोडून गेले असले तरी त्यांच्या व्यक्तिमत्वाने आजही या जगावर अधिराज्य गाजवलेले आहे. त्यांनी या विश्वाला दिलेली नैतिक मुल्ये आजही विश्वाला वंदनीय अशीच आहेत. भारत देशाची ओळख ही प्राचीन कालखंडात गौतम बुद्धाने दिलेल्या शांततेच्या तत्वज्ञाने जगभर ओळख निर्माण केली होती. तशीच महात्मा गांधींच्या नैतिक मूल्यांनी आज जगभरात भारताची ओळख निर्माण झाली आहे. त्यामुळे महात्मा गांधीना संपवण्यात सनातन्यांना यश आले असले तरी त्यांचे आजही या विश्वाने स्वीकारलेले विचार संपवता आले नाहीत. त्याचे खरे कारण म्हणजे महात्मा गांधींच्या कार्यकर्तृत्वाला लाभलेली नैतिक मुल्यांची जोड हे होय. महात्मा गांधींचे दक्षिण आफ्रिकेतील कार्य आणि भारतातील कार्य या दोन्ही टप्प्यांमध्ये त्यांनी विकसित केलेली सत्य, अहिंसा ही नैतिक मूल्य महत्वाची आहेत. या नैतिक मूल्यांना महात्मा गांधीनी निर्भयतेची जोड दिली. ही नैतिक मुल्ये अत्यंत निर्भीडपणे रुजविण्याचे कार्य त्यांनी केले. हीच निर्भयता जनसामान्य माणसांमध्ये निर्माण करण्याचे कामही त्यांनी केले. याच अनुषंगाने महात्मा गांधींच्या जन-आंदोलनांतील निर्भयता या विषयावर प्रस्तुत शोध निबंधात मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे.

महात्मा गांधी बालवयात सर्वात भित्रे होते. त्यांना चोर, भुते,दरोडेखोर, साप यांची प्रचंड भीती वाटत असे. याशिवाय अंधाराची भीतीही त्यांना लहान असताना वाटायची या भीतीपासून धीर मिळावा म्हणून राम नावाचा जप करायला सुरुवात केली. एव्हढेच काय तर बालवयात त्यांना कधी कधी स्वताच्या सावलीचीही त्यांना भीती वाटायची असे त्यांनी आपल्या सत्याचे प्रयोगमध्ये नमूद केले आहे. आपल्या प्रारंभीच्या जीवनात प्रचंड भित्रा असणारा हा माणूस पुढील काळात अन्यायाच्या विरोधात निर्भयपणे उभा राहतो आणि जगाच्या इतिहासात आपल्या कार्य कर्तृत्वाचा ठसा निर्भयतेने उमटवतो. इंग्लंडमध्ये जाऊन उच्च शिक्षण घेऊन परत आल्यानंतरही त्यांच्यातील हा भित्रेपणा गेला नव्हता. इंग्लंडमधून ते बैरीस्टर होवून भारतात आले. तरी त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होऊ शकला नाही. त्यामुळे ते मनोरुग्ण


This journal is © AAASSHER 2023

Scanned by CamScanner

वाटावे इतपत लाजाळू बुजरे बनले. वकिली करताना त्यांचे हातपाय थरथरत असत आणि कंठातून आवाज बाहेर येत नसे.[१] याच गांधीनी स्वतासह आपल्या परिघात आलेल्या प्रत्येक व्यक्तीला निर्भय बनवले. निर्भयता हा गांधी मध्ये निर्माण झालेला सर्वोच्च गुण होता. अर्थात हा त्यांचा प्रवास सहज झालेला नाही त्यासाठी त्यांच्या मोहनदास ते महात्मा या प्रवेशला समजावून घ्यावे लागेल.

गांधीजीनी स्वताच्या आयुष्याला एक प्रयोगशाळा बनवले होते अर्थात हे प्रयोग करत असताना त्यांनी त्याची कुणावर सक्ती केलेली नाही. 'निर्भयता म्हणजे मी स्वत: कुणाला भिणार नाही आणि मी कुणालाही भीती दाखवणार नाही'[२] या उक्तीप्रमाणे गांधीनी स्वताला बनवले होते. आजही भाय्मिक्त जग निर्माण करायचे असेल तर गांधींच्या विचाराशिवाय पर्याय नाही. निर्भयता नसेल तर सत्य वांझ ठरते, विश्वास दुबळा ठरतो, प्रेमात उणेपणा राहतो, विचारांना कृतींची जोड राहत नाही, नैतीकतेचा खरा कस लागत नाही, प्रामाणिकपणा व्यवहारात उरत नाही, आत्मविश्वास कसाला लागत नाही, महान ध्येय्य साकारत नाही.[३] या महान ध्येय्य सिद्धीसाठी महात्मा गांधीनी आपल्यात असलेली भयभितत झुगारून दिली आणि निर्भय बनवले. कोणत्याही महापुरुषाला त्याच्या पूर्ण रुपात समजून घेणे अतिशय कठीण गोष्ट आहे, त्यातल्यात्यात गांधीजींना. त्यांनी आयुष्यभर नैसर्गिक प्रेरानांशी संघर्ष केला. त्यांत समाजाशी आणि स्वताशी केलेला संघर्ष अतिशय जातील स्वरूपाचा होता. त्याला अनेक परिमाणे होती.[४] गांधीजींच्या निर्भयतेची सुरुवात हि दक्षिण आफ्रिकेत असताना झाली. आफ्रिकेत रेल्वेने प्रवास करताना प्रथमवर्गाचे तिकीट असतानाही केवळ कृष्णवर्णीय असल्याने गांधीना अपमानास्पद अवस्थेत गाडीतून खाली उतरविण्यात आले. त्यांचे समान खाली फेकून देण्यात आले. या प्रसंगानेच त्यांना निर्भय बनवले. हा अन्याय त्यांनी निमुटपणे सहन न करता गोऱ्या ब्रिटिशा शासनकर्त्यांनी भारतीय व आफ्रिकन लोकांना दिलेल्या अन्याय वागणुकीच्या विरोधात ते निर्भयपणे उभे राहिले त्यातूनच त्यांचे हे निर्भय व्यक्तिमत्व विकसित झाले. निर्भय व्यक्तिमत्वाच्या गांधीनी शासनाच्या विरोधात सत्याचा आग्रह लावून धरला आणि सत्याग्रह तंत्राचा उदय झाला.

दक्षिण आफ्रिकेतील गांधीजींचे आंदोलन हे प्रामुख्याने व्यापारी आणि वाकीलासाठी सुरु केलेले होते. या आंदोलनांचे वैशिष्ट्य म्हणजे हि आंदोलने अहिंसक होती.[५] हातात शास्त्र न घेता केलेले हे आंदोलन शासन आणि लोकांसाठी नवीन होते परंतु याही पद्धतीने अन्यायाचा प्रतिकार करून अन्यायी राज्यव्यवस्थेत परिवर्तन घडवून आणता येते हे या आंदोलनचे विशेष होते. म्हणून या आंदोलनांनी सामान्य लोकांमध्ये एक प्रकारे जुलमी शासनव्यवस्थेविरोधात उभे राहण्याची निर्भयता लोकांना देवू केली होती. दक्षिण आफ्रिकेत गांधीजीनी केलेल्या आंदोलनांमध्ये तेथील परिस्थितीनुसार विविध धर्म संप्रदाय, आणि वर्गांचे लोक एकजूट होवून सहभागी झाले होते. हा अनुभव त्यांना भारतातील स्वातंत्र्य चळवळीत कामी आला. कारण भारतात यावेळी चालू असलेल्या राष्ट्रीय आंदोलनाची दिशा हि नावापुरतीच राष्ट्रीय होती त्यात सर्वसमावेशकता नव्हती. गांधीजींना त्यांच्या दक्षिण आफ्रिकेतील निर्भीड कार्यामुळे भारतात येण्यापुर्वीच आंतरराष्ट्रीय प्रसिद्धी मिळवून दिली होती.[६]

महत्मा गांधीच्या दक्षिण आफ्रिकेतील कार्याची प्रत्यक्ष अनुभूती भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एक मवाळ नेते गोपाळ कृष्ण गोखले यांनी घेतली होती. त्यामुळे त्यांनी गांधींच्या भारतातील आगमनापूर्वीच असे सांगितले होते की, वीर आणि शहिदांच्या ठिकाणी आवश्यक असणारे सर्व गुण गांधींमध्ये आढळतात. गांधींकडे लोकांना आकर्षित करण्याची विलाक्ष्ण प्रतिभा आहे. त्यांच्यात व्यक्तीला संघर्षशील आणि बलीदानी बनवण्याची अद्भुत क्षमता आहे.[७] हे गोखले यांचे गांधीजीविषयीचे भाकीत पुढील कालखंडात तंतोतंत खरे ठरले. कोणतीही व्यक्ती वीरत्वाच्या ठिकाणी पोहोचण्यासाठी त्यांच्यात निर्भयता असणे आवश्यक असते. त्याचबरोबर शहीद होण्याचे धाडस म्हणजे मृत्युच्या भायापलीकडे जाण्याची क्षमता निर्माण करणे. महात्मा गांधीजींनी त्यांच्या सबंध आयुष्यात मृत्यूचे भय कधीच बाळगले नाही. आफ्रिकेत असतानाही त्यांच्यावर प्राणघातक हल्ले झाले होते. आणि त्यांच्या मृत्युपुर्वीही त्यांच्यावर पाच वेळा ठार मारण्याचे प्रयत्न झाले होते. परंतु अशा प्रसंगांना ते कधीही घाबरलेले नाहीत. उलट त्यांना मारण्यासाठी आलेल्या व्यक्तीला आपल्या



Scanned by CamScanner

सहवासात राहण्याचे व चर्चा करण्याचे आवाहन महात्मा गांधी करतात ही निर्भयताच गांधींना महात्मा बनविणारी ठरते.

महात्मा गांधीनी आफ्रिकेतून भारतात आल्यानंतर नामदार गोखलेंच्या सूचनेनुसार भारतभ्रमंती केली. य भ्रमंतीत त्यांना जे भारत दर्शन घडले त्यामुळे त्यांच्यातील भारतीयाप्रती प्रेमभावना अधिकच बळकट बनत गेली. भारतात महत्मा गांधीच्या आंदोलनाची सुरुवात चंपारण्य येथे नीळ उत्पादक शेतकऱ्यांसाठी केली. चंपारण येथे १९१७ च्या शेतकऱ्यांच्या समस्या समजावून घेवून त्यात मार्ग काढण्यासाठी महात्मा गांधी गेले होते. जमीनदरांनी चम्पारण्यातील शेतकऱ्यांनी आपापल्या शेतीवरील तीनविशांस भागावर तिच्या मुल मालकीसाठी निळीच्या लागवडीची सक्ती करण्याचा कायदा केला. त्याला 'तीन काठिया' असे नाव होते. चंपारण्यात वीस कथांचा एक एकर होत असे. एकरी तीन कथांची निळीची लागवड करणे म्हणजेच तीन काठिया पद्धती होय. या पद्धतीमुळे शेतकऱ्यांचे आपल्या मनाप्रमाणे शेतात पिकाची लागवड करण्याचे स्वातंत्र्य हिरावून घेतले गेले'[८] या अन्यायापासून शेतकऱ्यांची मुक्तता व्हावी या मागणीसाठी चम्पारण मधील एक शेतकरी राजकुमार शुक्ल हे राष्ट्रीय कॉंग्रेसच्या अधिवेशनात तत्कालीन राष्ट्रीय कॉंग्रेसचे नेते बाळ गंगाधर टिळक व मदन मोहन मालवीय यांना विनंती करीत होते. परंतु त्यांनी राजकुमार शुक्ल यांच्या प्रश्नाकडे पाठ फिरवून आम्हाला आता तातडीने राजकीय स्वातंत्र्य मिळवायचे असल्याने आमच्याजवळ चाम्पाराण्यातील निळीचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रश्न समजून घेण्यासाठी अजिबात वेळ नाही, असे स्पष्टपणे सांगितले. राजकुमार शुक्ल यांनी शेवटचा पर्याय म्हणून आफ्रिकेत नावलौकिक मिळवलेल्या गांधीजींची भेट घेतली व चम्पारण येथे येण्याची विनंती केली. गांधींनी सुरुवातीला नकार दिला परंतु नंतर शुक्ला यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे गांधीजी चंपारण येथे आले.

चंपारण म्हणजे जनक राजाची भूमी. ही भूमी गांधीजींसाठी आगदी नवखी होती. ते यापूर्वी कधी तिकडे गेले नव्हते, चंपारण परिसरात मोतीहारी नावाचा एक शहर होते. मोतीहारीपासून जवळच एका शेतकऱ्यावर अत्याचार झाले होते. तेंव्हा त्या व्यक्तीला भेटण्यासाठी व्तेथिल प्रश्न समजावून घेण्यासाठी गांधीजी दुसऱ्या दिवशी तिकडे जायला निघाले. तेंव्हा 'मळेवाल्यांच्या संघटनेच्या चिटणीसांनी गांधीना सरळ तुम्ही इथे परके आहात तेंव्हा शेतकऱ्यांच्या प्रश्नात नाक खुपसू नका असे सांगितले, कमिशनरनेही इथून पुढे जाऊ नका अशी धमकीच दिली.'[९] परंतु गांधी अशा धमक्यांना घाबरणे शक्य नव्हते. अशा धमक्यांच्या पलीकडे त्यांच्यात निर्भयता निर्माण झाली होती. शेवटी पोलीस सूपरीटंडन्टची नोटीस आली, गांधींनी चंपारण सोडून जावे. गांधींनी निरोप दिला, 'मी चंपारण सोडून जाणार नाही, मला पुढे जायचे आहे, तपासही करायचा आहे.'[१०] गांधींनी भारतात प्रथमताच अशा प्रकारचा पोलीस सूपरीटंडन्टचा आदेश मोडला होता. त्यामुळे अर्थातच त्यांना दुसऱ्या दिवशी कोर्टात उपस्थित राहण्याचे समन्स मिळाले. सरकारच्या विरोधात अशा प्रकारची कृती शेतकऱ्यांच्या प्रश्नावरून अद्याप कोणी केलेली नव्हती. शेतकरी वर्गात ब्रिटीश सत्ता व प्रशासनाची जी दहशत होती, त्यालाच आव्हान देवून या दहशतीमधील गांधींनी हवाच काढून घेतली. चंपारण मधील जनतेने असे दृश्य यापूर्वी कधीच पहिले नव्हते. त्यामुळे गांधीच्या भोवती किंवा जावे तिकडे टोळयाच टोळया दिसू लागल्या. गांधींच्या या कृत्याला मोडीत काढण्यासाठी गांधीना या प्रदेशातून घालवण्यासाठी कलेक्टर, मेजीसट्रेट,पोलीस सूपरीटंडन्ट यांनी एकत्रित नोटीसा दिल्या.

या प्रसंगाबद्दल महत्मा गांधी म्हणतात की, 'दिलेल्या नोटिसांचा ते कायदेशीररित्या विरोध करू शकले असते. परंतु त्यांना तसा विरोध करावयाचा नव्हता, तर त्यांच्या हुकुमाचा सविनय भंगच करावयाचा होता. त्यामुळे त्यांना एकप्रकारची निर्भयता प्राप्त झाली. मला त्रास देण्याएवजी लोकांना मर्यादेत राखण्याच्या कमी त्यांनी माझ्या व माझ्या सोबत्यांच्या मदतीची खुशीने उपयोग केला. पण त्यावरोबरच त्यांच्या हेही लक्षात आले कि, आपली सत्ता आजपासून लुप्त झाली. लोक क्षणभर शिक्षेचे भय सोडून आपल्या नव्या मित्राच्या प्रेम शक्तीच्या अधीन झाले.'[११] चंपारण सत्याग्रहाने लोकांना भयमुक्त करून निर्भय बनवले. महात्मा गांधींच्या नैतिक मूल्याची किमया होती. यापूर्वी अशा प्रकारची स्थिती



This journal is © AAASSHER 2023

Scanned by CamScanner

लोकांनी अनुभवलेली नव्हती. ती गांधींच्या चम्पारण्यात येण्याने अनुभवता आली. एक क्षण जमीनदारांच्या, ब्रिटीश सत्तेच्या आणि पोलिसांच्या शिक्षेची कसल्याच प्रकारची भीती त्यांना राहिलेली नव्हती.

या सर्व प्रकरणात महात्मा गांधीना कसल्याही प्रकारे राष्ट्रीय कॉंग्रेसचा पाठींबा नव्हता. किंबहुना या परिसरातील लोकांना कॉंग्रेसचे नावही माहिती नव्हते. अशा परिस्थितीत गांधीनी ब्रिटीश सत्तेच्या विरोधातील लोकांमध्ये भयमुक्त स्थिती निर्माण करण्याचे काम केले. यातून लोक गांधीच्याप्रमाणे निर्भय बनत गेले. एवढेच नाही तर सरकारच्या हुकुमाचा भंग केल्याबद्दल गांधीनीच स्वत; शिक्षेची मागणी केली तेही कठोरातील कठोर शिक्षा. त्यामुळे लोक आतापर्यंत सरकारच्या शिक्षेला घाबरायचे ती भीतीच गांधीनी सविनय हुकुम भंग करून काढून टाकली. अशाच प्रकारचे प्रयोग गांधीनी विविध आंदोलनामध्ये केले. अहमदाबादच्या कामगारांचा प्रश्न, खेडा येथील शेतकऱ्यांचा प्रश्न रौलेतट कायद्याचा विरोध, खिलापत चळवळ, असहकार चळवळ, सविनय कायदेभंग चळवळ, छोडो भारत चळवळ अशा सर्व चळवळीत महात्मा गांधीनी लोकांना ब्रिटीश शक्तीच्या दडपशाहीतून, अन्याय, अत्याचारापासून भयमुक्त करून त्यांच्यात निर्भयता निर्माण करण्याचे काम केले. निर्भयता निर्माण करत असताना त्यांच्यात आत्मबल पेरण्याचे कामही त्यांनी केले. यात स्त्रियांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला. स्वातंत्र्याची चळवळ टिळकांच्या पश्चात गांधीनी लोकांची बनविली व सक्रीय केली.[१२] त्याचे सर्व श्रेय गांधीजींच्या सर्व जनांदोलनातील निर्भय्तेला द्यावे लागते.

गांधीनी ज्या तीन मुख्य चळवळीचे नेतृत्व केले त्यातील एकही चळवळ पूर्णतः यशस्वी झाली किंवा त्यामुळे विशेष ध्येय्य प्राप्ती झाली असे प्रत्यक्ष दर्शनी निष्कर्ष काढता येत नाही. या सर्व चळवळी थोडक्यात अयशस्वीच झाल्या असे म्हणावे लागेल परंतु गांधी आणि त्यांचे तंत्र मात्र पराभूत झाले नाही तर ते प्रत्येक चळवळीनंतर यशस्वीच बनलेले दिसते. गांधीनी कधीही एखादी चळवळ सुरु करताना अथवा ती थांबवताना आपल्या नेतृत्वाच्या भविष्याचा विचार केला नाही. आपण अयशस्वी झालो तर आपले नेतृत्व लोकमान्य राहणार नाही वगैरे मुद्दा त्यांच्या कार्यशैलीत कधीच नव्हता. या अर्थानेही ते निर्भय होते. गांधी त्यांच्या १९२० ते १९४८ या राजकीय कारकिर्दीत स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या राष्ट्रीय कॉंग्रेसचे अध्यक्ष केवळ एकदाच होते तरीही या कालखंडात गांधींच्या सल्ल्याशिवाय कॉंग्रेस निर्णय घेवू शकत नव्हती हि क्षमता गांधीनी आपल्या नैतिक मुल्यामधून निर्माण केली होती. त्यासाठी जी प्रामाणिकता, सचोटी, कर्तव्याबाबतची उच्च पराकोटीची भावना लागते ती गांधींकडे होती आणि तेवढीच निर्भयता होती. म्हणू या काळात गांधी म्हणजे कॉंग्रेस, कॉंग्रे म्हणजे गांधी, ब्रिटीशांच्या दृष्टीने भारत म्हणजे गांधी आणि गांधी म्हणजे भारत अशी स्थिती निर्माण झालेली होती. यातच गांधींच्या निर्भयतेचे यश सामावलेले आहे.

## संदर्भ सूची


१. कसबे रावसाहेब,(प्रस्तावना) गांधी पराभूत राजकारणी आणि विजयी महात्मा, लोकवाङ्मय ग्रह, मुंबई, २०२१ पृ.१९.

२. सूर्यवंशी उमेश, निर्भय, प्रकाशक-साठी सुषमा उमेश सूर्यवंशी, कोल्हापूर, २०२२, पृ.१४०.

३. उपरोक्त, सूर्यवंशी उमेश, पृ.१४०-१४१.

४. उपरोक्त, कसबे रावसाहेब,(प्रस्तावना) पृ.१९.

५. सरकार सुमित, आधुनिक भारत १८८५-१९४७, राजकमल प्रकाशन, नवी दिल्ली,२००६, पृ.१९८.

६. उपरोक्त, सरकार सुमित पृ.१९८.

७. चंद्र बिपीन, भारत का स्वतंत्रता संघर्ष, हिंदी मध्यम कार्यान्वय निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली, २००४, पृ.१२८.




Scanned by CamScanner

८. उपरोक्त, कसबे रावसाहेब, पृ.२०९.
९. उपरोक्त, कसबे रावसाहेब, पृ.२१२.
१०.गांधी मोहनदास,पटवर्धन सीताराम (अनु), सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथन, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, २०११, पृ.३९१.
११.उपरोक्त, गांधी मोहनदास,पटवर्धन सीताराम (अनु), पृ.३९२
१२.द्वादशीवार सुरेश, गांधीजी आणि त्यांचे टीकाकार, साधना प्रकाशन, २०१८, पृ.१०.


This journal is © AAASSHER 2023

Scanned by CamScanner